मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी इस्त्रायल देशाच्या कंपनीसोबत केलेल्या प्राथमिक करारानुसार निधी वाटपाबाबत. (लेखाशिर्ष-२२१५ ए०२३)

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्र.ग्रापापु-२०१७/प्र.क्र.१४५/पापु-१०
जी. टी. हॉस्पिटल आवार, नवीन मंत्रालय,
७ वा मजला, मुंबई-४०० ००१.
दिनांक: १७.०३.२०१८

वाचा:

१) शासन निर्णय क्र. ग्रापाधो-१११६/प्र.क्र.१२२/पापु-७, दिनांक ६ डिसेंबर, २०१६.
२) शासन निर्णय क्र. मवॉगी-२०१७/प्र.क्र.७२/पापु-१८, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७.

प्रस्तावना-

मराठवाड्यातील जनतेस सततच्या कमी पर्जन्यनामुळे वारंवार पाणी टंचाईस तोंड द्यावे लागते. मराठवाडा विभागासाठी औरंगाबाद येथे दिनांक ४ ऑक्टोंबर, २०१६ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत मराठवाडा विभागातील पाणी समस्या सोडविण्याच्या दृष्टीने ग्रीड पध्दतीची पाणी पुरवठा योजना तयार करण्यासाठी तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने मराठवाडा विभागासाठी ग्रीड पध्दतीने पाणी पुरवठा करण्याच्या योजनेच्या पूर्वव्यवहार्यता अहवाल तयार करण्यासाठी मा. मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. सदर कामाकरिता सन २०१७ च्या दुसऱ्या अधिवेशनात रु. १५,००,००,०००/- (अक्षरी रुपये पंधरा कोटी मात्र) इतका निधी पूरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. तद्नुषंगाने मराठवाडा विभागासाठी ग्रीड पध्दतीच्या पाणी पुरवठा योजनेकरिता पूर्वव्यवहार्यता (Pre feasibility DPR) अहवाल तयार करण्याकरिता सर्वेक्षण करणे व इतर कामाकरिता उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ च्या शासन निर्णयान्वये रक्कम रु. १३,९०,७८,०००/- (अक्षरी रुपये-तेरा कोटी नव्वद लाख अठ्यात्तर हजार मात्र) इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व इस्त्रायल देशाच्या मेकोरोट डेव्हलपमेंट ॲन्ड एन्टरप्रायजेस लि. (MEKOROT Development and Enterprises Ltd.) कंपनीसमवेत दि.२१/०२/२०१८ रोजी करार झाला आहे. त्यानुसार त्या कंपनीला या कामासाठी एकूण ३३,०७,६२१ US डॉलर (भारतीय कर वगळून) देय आहे. त्यापैकी Pre payment after signing agreement १२.५% असल्याचे दिसते. भारतीय चलनात डॉलरचा भाव रु. ६५ विचारात घेता कंपनीला जवळपास एकूण रु. २१.५० कोटी अहवालासाठी द्यावे लागणार आहेत. रु. २१.५० कोटीच्या १२.५% रक्कम रु. २.६८७५ कोटी होते. तर सदर रकमेवर १८% GST रु. ०.४८३७५ कोटी होतो. म्हणजेच कंपनीला चालु आर्थिक वर्षात देय द्यावयाची रक्कम रु. २.६८७५ कोटी + GST (रु. ०.४८३७५ कोटी) = रु. ३.१७१२५/- कोटी (रुपये तीन कोटी सतरा लक्ष बारा हजार पाचशे मात्र) वितरीत करणे आवश्यक ठरते. यास्तव, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी इस्त्रायल देशाच्या कंपनीसोबत केलेल्या कराराच्या अनुषंगाने निधी वाटपाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय-

मराठवाडा विभागासाठी ग्रीड पध्दतीच्या पाणी पुरवठा योजनेकरिता दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी इस्त्रायल देशाच्या मेकोरोट डेव्हलपमेंट ॲन्ड एन्टरप्रायजेस लि. (MEKOROT Development and Enterprises Ltd.) कंपनीसोबत केलेल्या एकूण ३३,०७,६२१ US डॉलर (भारतीय कर वगळून) रक्कम म्हणजेच भारतीय चलन किंमत रु. २१.५० कोटी कराराच्या रकमेपोटी एकूण कराराच्या १२.५% (म्हणजेच रु. २.६८७५ कोटी) + GST (रु. ०.४८३७५ कोटी) असे एकूण रु. ३.१७१२५/- कोटी (रुपये तीन कोटी सतरा लक्ष बारा हजार पाचशे मात्र) सदर कंपनीस द्यावयाच्या अग्रीमाची रक्कम अदा करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास इतका निधी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर व मुक्त करण्यात येत आहे.

अटी:

१) सदर प्रशासकीय मान्यतेस प्रथम तांत्रिक मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात यावी.
२) निधी ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहे त्या विनिर्दिष्ट प्रयोजनासाठीच खर्च करावे.
३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत.
४) सदर योजनेची अंमलबजावणी कोणत्याही कारणाने खर्चात वाढ झाल्यास प्रशासनाकडून जादा अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार नाही.

२. या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना मुक्त करण्यात आलेला निधी रु. ३,१७,१२,५००/- (रुपये तीन कोटी सतरा लक्ष बारा हजार पाचशे मात्र) बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे संचालक (वित्त), (श्री. सुधाकर डांगे) यांच्या स्वाक्षरीने तयार केलेले व उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, (श्री. म. भ. सावंत) यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई यांना सादर करण्यात यावे. संचालक (वित्त), (श्री. सुधाकर डांगे) यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, (श्री. म. भ. सावंत) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर रक्कम एनईएफटी (NEFT) प्रणालीद्वारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या खाती जमा करण्यात यावी.

३. या योजनेवर होणारा खर्च सन २०१७-१८ मध्ये मागणी क्र. वाय-२, २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा, १९६ जिल्हा परिषदांना सहाय्य, (०२) जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने, (०२) (०१) मराठवाडा एकात्मिक ग्रीड पध्दतीने पाणी पुरवठा योजनेसाठी सहायक अनुदान (२२१५ ए०२३)-३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ३०/०६/२०१७ अनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. वित्त विभाग परिपत्रक दिनांक १८/०४/२०१७ मधील अनुक्रमांक ७ ते १८ मधील अटींची तसेच सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक १ ते ८ व क्र. ८ मधील तपासणी सूचीतील अनुक्रमांक १ ते १० मधील अटींची पुर्तता होत आहे.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.८०/व्यय-३, दिनांक ०५.०३.२०१८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.Maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३१७१७०४०२७४२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार वा नावाने,

Deelip Pandurang Patil

Digitally signed by Deelip Pandurang Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3810fd2c32f3841df60ca68a27ae50fdbc9fd6c506fd334325871d684bf3eef9, cn=Deelip Pandurang Patil
Date: 2018.03.17 17:05:48 +05'30'

(दिलीप पां. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई.
२. महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-२नागपूर.
३. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विधानमंडळ सदस्य (सर्व)
६. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
८. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद.
९. विभागीय आयुक्त, औरंगाबाद.
१०. जिल्हाधिकारी, औरंगाबाद.

११. उप सचिव तथा नियंत्रक अधिकारी (रोख शाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था (वासो), बेलापूर, नवी मुंबई.
१३. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद.
१४. संचालक (वित्त) तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
१५. उप संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, औरंगाबाद.
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,औरंगाबाद/जालना/बीड/हिंगोली/परभणी/लातुर/नांदेड/ उस्मानाबाद.
१७. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण औरंगाबाद/जालना/बीड/हिंगोली/परभणी/लातुर/नांदेड/ उस्मानाबाद.
१८. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (का.१४४३)/वित्त विभाग (व्यय-३), मंत्रालय, मुंबई.
२२. कार्यासने (पापु-०४, ०६, ०७, ०९, १८, १३, १७, १८ व २०), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३. निवडनस्ती कार्यासन-पापु-१०